जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-12/2019
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 15.11.2019

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. धबाले दिक्षा कपिल,** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 22.11.2019 रोजी दुपारी 03.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती -------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

मा. आयुक्त यांचे पत्र दिनांक 02.02.19 व 15.03.19 व्दारे श्री स. जिलानी स. मौला शिपाई यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना दि. 01.04.18 पासुन करण्यात आली असल्यामुळे संबंधीतास आर्थीक मदत मंजुर केल्याबाबतचे प्रकरण हे पुर्वीचे असल्यामुळे उर्वरीत रक्कम त्यांना देता येणार नाही असा अहवाल मनपा प्रशासनाने सर्वसाधारण सभेसमोर सादर केलेला होता तथापि मनपाकेच्या सर्वसाधारण सभेने सदर अहवाल विचारात न घेता प्रशासकीय अहवालाच्या विरुध्द व विसंगत असा ठराव पारीत केलेला आहे. प्रशासकीय अहवालाच्या विरुध्द असुन संयुक्तदीक व सनदशीर ठरत नसल्यामुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं. 134 दिनांक 30.11.18 विखंडीत करण्याची शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. नामपा-2019/प्र.क्र.69/नवि-24 दिनांक 01.08.19 अन्वये **शासनाने महाराष्ट्र मनपा अधिनियम चे कलम 451(1) नुसार विखंडीत करण्यासाठी प्रथमत: निलंबीत केले असुन त्याची नोंद घेणे बाबत.**

**विषय क्रं. 02**

मा. आयुक्त यांचे पत्र दिनांक 11.07.16 व 19.09.18 व्दारे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं 47 दि. 16.05.16 विखंडीत करण्यासाठी शिफारस केली होती. त्यानुसार शासन निर्णय समक्रमांक दिनांक 31.08.18 अन्वये प्रथमत: निलंबीत केला होता. सदरील ठरावानुसार श्रीमती सबिहा बेगम भ्र. स. महेमुद यांनी दि. 26.06.18 रोजी अभिवेदन सादर केला असुन संबंधीतांच्या अभिवेदनात श्री स. महेमुद स. करीम यांच्या निलंबनाबाबत कोणताही नविन मुद्दा उपस्थित केलेला नाही व त्यांच्या वारसास नियमानुसार दरमहा कुटूंब निवृत्ती वेतन देण्यात येत आहे. त्यामुळे त्यांचेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय झालेला नाही. करिता महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक 01.08.19 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 47 दिनांक 16.05.16 हा नियमबाह्य असुन मनपाकेस आर्थीक नुकसानीचा आहे त्यामुळे **महाराष्ट्र मनपा अधिनियम चे कलम 451(3) नुसार अंतिमत: विखंडीत करण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.**

**विषय क्रं. 03**

मा. आयुक्त यांचे पत्र दिनांक 06.06.19 व्दारे श्री रामेश्वर गहलोत जकात जवान यांना दिनांक 18.03.08 रोजी बडतर्फ करण्यात आलेले असुन सदरील आदेशा विरुध्द नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 143 दिनांक 28.02.17 हा नियमबाहय असुन महानगरपालिकेस आर्थीक नुकसानीचा असल्याचे असुन सदरचा ठराव शासनास विखंडीत करण्याची शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. नामपा-2017/प्र.क्र.141/नवि-24 दिनांक 01.08.19 अन्वये **शासनाने महाराष्ट्र मनपा अधिनियम चे कलम 451(3) नुसार अंतिमत: विखंडीत केलेला असुन त्याची नोंद घेणे बाबत.**

**विषय क्रं. 04**

मा. आयुक्त यांचे पत्र दिनांक 15.03.19 व 25.06.19 व्दारे श्री संभाजी माधवराव कास्टेवाड जकात अधिक्षक यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करुन त्यांचा निलंबन कालावधी हा निलंबन काळ म्हणुन गृहीत धरण्यात आलेला असुन महानगरपालिकेने त्यांच्यापवर ठपका ठेवण्याची सौम्य शिक्षा बजावलेली असुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 127 दिनांक 30.01.2019 हा नियमानुसार नसुन, महानगरपालिकेच्या आर्थीक हिताच्या विरुध्द असल्यामुहे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 451 (1) नुसार विखंडीत करण्यासाठी शिफारस करण्यात आलेली असुन त्यानुसार शासन निर्णय क्रं. नामपा-2019/प्र.क्र.106/नवि-24 दिनांक 30.08.19 अन्वये प्रथमता: निलंबित करण्यात आले असुन त्याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्रं. 05**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/5513/19 दिनांक 26.08.19 अन्वये सुधारीत वेतनश्रेणी (सहाव्या वेतन आयोगानुसार) निवृत्तीवेतन / कुटूंब निवृत्ती वेतन धारीकांना दि. 01 जुलै 2018 पासुन 148% व दिनांक 01 जानेवारी 2019 पासुन 145% महागाई भत्ता वाढ करण्यासाठी शासन निर्णय दिनांक 16 ऑक्टोंबर 18 व 21 ऑगस्ट 19 अन्वये थकबाकीसह रोखीने अदाई करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मंजुर प्रदान करण्यात आली त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील सुधारीत वेतनश्रेणी (सहाव्या वेतन आयोगानुसार) निवृत्तीवेतन / कुटूंब निवृत्ती वेतन धारीकांना दि. 01 जुलै 2018 पासुन 148% व दिनांक 01 जानेवारी 2019 पासुन 145% महागाई भत्ता वाढ करण्यासाठी शासन निर्णय दिनांक 16 ऑक्टोंबर 18 व 21 ऑगस्ट 19 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे बाबत.

**विषय क्रं. 06**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/5513/19 दिनांक 26.09.19 अन्वये महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय निर्णय क्रं. निमवा/2019/प्र.क्र.313/सेवा-4 दिनांक 21 ऑगस्ट 19 नुसार असुधारीत वेतनश्रेणीत (सहाव्या वेत आयोगानु) नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेतील निवृत्तीवेतनधारक/कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनावर दिनांक 01 जुलै 18 पासुन अनुज्ञेय महागाई वाढीचा दर 142% वरुन 148% करण्यात येत आहे सदर महागाई वाढीची रक्कम दिनांक 01 जुलै 18 ते 30 जुन 19 पर्यंतच्या कालावधीतील थकबाकीसह रोखीने अदाई करण्याची प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात आली. त्यानुसार शासन निर्णय दि. 21 ऑगस्ट 19 नुसार नावाशमनपाकेतील निवृत्तीवेतन धारक/कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनावर दि. 01 जाने-19 पासुन अनुज्ञेय महागाई वाढीचा दर 148% वरुन 154% करण्यात येत आहे सदर महागाई वाढीची रक्कम दिनांक 01 जुलै 19 पासुन रोखीने अदाई करण्याची प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात येते दिनांक 1 जाने-19 ते 30 जुन 19 या 06 महिण्याचे कालावधीतील थकबाकी बाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमीत करण्यात आली त्यास कार्यात्तर मान्यता देणे बाबत.

**विषय क्रं. 07**

नावाशमनपा हद्यीत शोभानगर गृहनिर्माण संस्था येथील मालमत्ता धारक श्री अरविंद नागनाथ फड यांचे मालकीची जागा आहे सदरील जागेत मलवाहिनीचे क्रास कनेक्शनसाठी जागा मालकास मावेजा देवुन रजिस्टर करुन घेण्यास मान्यता देणे बाबत

**विषय क्रं. 08**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/18317/19 दिनांक 16.03.2019 या कार्यालयास प्राप्त दिनांक 12.06.2019 अन्वये कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई-32 यांचे पत्र क्रं. नावामनपा-2015/प्र.क्र.11 /नवि-24 दिनांक 29.01.19 अन्वये तिन सहाय्यक आयुक्त हे दिनांक 05.04.1999 च्या शासन निर्णयान्वये सहाय्यक आयुक्त या पदाची शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्यामुळे त्यांना सहाय्यक आयुक्त या पदावर मनपाकेने दिलेल्या पदोन्नतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45(4) नुसार शासनाची मान्यता देता येत नाही असे कळविले होते. त्यानुसार संबंधीतास दिनांक 30.01.2019 रोजी सहाय्यक आयुक्त या पदावरुन पदावन्नत करुन ते पुर्वी जे पद धारण करीत होते त्याच पदावर कायम करण्यात आले होते.

तथापि कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई-32 यांचे पत्र क्रं. नावामनपा-2015/प्र.क्र.111/ नवि-24 दिनांक 15.03.2019 अन्वये शासन पत्र दिनांक 29.01.19 मधील आदेश व त्यानुसार मनपा स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीस पुढील निर्णय होईपर्यंत शासनाने स्थगिती दिलेली आहे त्याअन्वये दिनांक 30.01.19 रोजी निर्गमीत केलेल्या आदेशास पुढील निर्णय होईपर्यंत स्थगिती देण्यात येते.

श्री प्रकाश माधवराव येवले नियत वयोमानानुसार दि. 31.01.19 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांच्या सेवानिवृत्ती बाबतचे सुधारीत आदेश स्वतंत्र निर्गमीत करण्यात येतील. तसेच श्री संजय नारायण जाधव व श्री अविनाश उमाकांत अटकोरे यांच्या पदस्थापने बाबतचे आदेश स्वतंत्र निर्गमीत करण्यात येतील. सदर आदेशाची अमलबजावणी परिणामाने व्हावी असे आदेश निर्गमीत करण्यात आलेले असुन त्यास मनपा सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

**स्वाक्षरीत/-**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**

**नगरसचिव नावाशमनपा नांदेड**